भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक तेवीसावा पीक सल्ला
# (कालावधी १२ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन– INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

### कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन – आयपीएम)


- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.
- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.

- **रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा..

## कापसाची स्वच्छ वेचणी व साठवणूक

- चांगला बाजारभाव मिळण्यासाठी कापसाची वेचणी स्वच्छ व योग्य पद्धतीने करावी.
- कापूस गोळा करण्यासाठी व साठवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्या, प्लास्टिकचे कापड किंवा कापसाव्यतिरिक्त इतर साहित्य वापरणे टाळावे.
- वेचलेला स्वच्छ कापूस त्याची गुणवत्ता व धाग्याचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी स्वच्छ आणि कोरड्या जागेत साठवावा.

## ब स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | पुढील आठवड्यात अंदाजे पाऊस (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोव्हेंबर | | | | | | | नोव्हेंबर | | | | |
| | | 03 | 04 | 05 | 06 | 07 | 08 | 09 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
|  | धुळे | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | | अति मुसळधार पाऊस | |

### पीक परिस्थिती:

- अकोला येथे पेरणी केलेल्या कापूस पिकाचे वय १३४ ते १३९ दिवस असून पीक सध्या बोंडे फुटण्याच्या व कापूस काढणीच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी केलेल्या पिकांमध्ये तसेच लवकर येणाऱ्या वाणांमध्ये कापूस वेचणीस सुरुवात झाली आहे. अहवाल कालावधीत दीर्घकाळ पावसाचा खंड पडलेला आढळून आला.

- राहुरी येथे पेरणीच्या वेळेनुसार कापूस पिकाचे वय १२७ ते १६२ दिवस असून पीक सध्या बोंडांची वाढ होणे व बोंडे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिकामध्ये पाणी देणे, खुरपणी, कोळपणी, तण नियंत्रण, कीटकनाशकांची फवारणी व खतांचा वापर ही कामे करण्यात आली आहेत. शेतामध्ये तणांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. फुलकिडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीपेक्षा (ETL) कमी आहे; मात्र अनेक शेतांमध्ये तुडतुडे व मावा यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या वर गेला आहे. काही ठिकाणी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भावही आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या वर आढळून आला आहे. अनेक शेतांमध्ये तंबाखू स्ट्रीक विषाणू TSV विषाणूजन्य रोग तसेच पराविल्ट ही समस्या आढळून आली आहे. काही ठिकाणी कापूस वेचणी सुरू आहे.

- नांदेड येथे पेरणी केलेल्या कापूस पिकाचे वय १२३ ते १४८ दिवस असून पीक सध्या बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. काही शेतांमध्ये लवकर पेरणी केलेल्या कापसाची वेचणी सुरू झाली आहे. शेतांमध्ये गवतवर्गीय, रुंद पानांची तणे तसेच लव्हाळा वर्गीय तणांचा प्रादुर्भाव आढळून आला. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आढळून आला; मात्र तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) कमी होता. काही तुरळक शेतांमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला.

**पीकसल्ला:**

- अकोला येथील शेतकऱ्यांना कापसाची वाणनिहाय स्वच्छ वेचणी करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे ओला झालेला कापूस वेगळा साठवून ठेवावा. लवकर येणाऱ्या बीटी कापूस वाणांची (१४०-१५० दिवसांचे संकरित वाण) कापणी पूर्ण झाल्यानंतर, सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास अधिक आर्थिक लाभ मिळविण्यासाठी हरभरा किंवा गहू यापैकी दुसरे रब्बी पीक घ्यावे. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी शेतामध्ये सर्वेक्षणाच्या उद्देशाने प्रति एकर २ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावेत. कापूस पिकातील कीड प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपात प्रति एकर २० झाडांचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त म्हणजेच ५ टक्क्यांपेक्षा अधिक आढळल्यास, थायोडिकार्ब ७५% @ २० ग्रॅम किंवा इंडोक्साकार्ब १५.८% @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी प्रोफेनोफॉस ४०% + सायपरमेथ्रिन ४% @ २० मिली किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ९.३ % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ४.६% @ ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून करावी. बोंडअळीच्या नियंत्रणासाठी स्पिनोसॅड @ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याचाही सल्ला देण्यात येत आहे. पिकाच्या नंतरच्या अवस्थेत पानांवर तांबूसपणा येऊ नये यासाठी बोंडांच्या वाढीच्या अवस्थेत १% युरिया व १% मॅग्नेशियम सल्फेट यांची फवारणी करावी.

- राहुरी येथील शेतकऱ्यांना किडींचा प्रादुर्भाव झालेला कापूस व प्रादुर्भाव नसलेला कापूस स्वतंत्रपणे वेचण्याचा तसेच पूर्णपणे उमललेल्या बोंडांची स्वच्छ वेचणी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. कापसाची वेचणी संकरित वाणानुसार स्वतंत्रपणे करावी. बाजारात चांगला दर मिळण्यासाठी वेचलेला कापूस साठवणुकीपूर्वी सावलीत स्वतंत्रपणे वाळवावा. कापूस वेचणी करताना कापूस पूर्णपणे वाळल्यानंतर स्वच्छ सूर्यप्रकाशात वेचणी करावी. स्वच्छ व सुरक्षित कापूस वेचणीसाठी कापूस वेचणी पिशव्यांचा वापर करावा. हाताने कोळपणी किंवा ट्रॅक्टर अथवा बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागतीची कामे करून पीक तणमुक्त ठेवावे. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) व फुलकिडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी शेतातील तसेच बांधावरील काँग्रेस गवत (पार्थेनियम) काढून टाकावे. दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यामुळे पिकाला ओलावा ताण जाणवत असल्यास १३:००:४५ या विद्राव्य खताची @ २ किलो प्रति एकर या प्रमाणात १५० ते २०० लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. ओलावा ताणाच्या परिस्थितीत सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास संरक्षित सिंचन द्यावे. ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास त्याद्वारे पिकाला पाणी द्यावे. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेताचे नियमित निरीक्षण करावे. पिवळे चिकट सापळे लावावेत. घरगुती पद्धतीने तयार केलेल्या ५% निंबोळी अर्काची (NSKE) किंवा अझाडिरॅक्टिन १०००० पी पी एम @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा अधिक वयाच्या कापूस पिकात रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त आढळल्यास फ्लोनिकॅमिड ५० WG @ २ ग्रॅम किंवा ब्युप्रोफेझिन २५ एस सी @ २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावेत. गुलाबी बोंडअळीच्या पुढील पिढीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी गुलाबी बोंडअळीच्या अळ्यांसह रोझेट फुले नियमितपणे गोळा करून नष्ट करावीत. कापसाच्या फुलांची नैसर्गिक गळ रोखण्यासाठी एन ए ए ४.५ एस एल @ ४.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे. कीड नियंत्रणासाठी केवळ लेबल क्लेम असलेल्या कीटकनाशकांचाच वापर करावा आणि कीटकनाशकांची एकत्रित मिश्रण फवारणी टाळावी. खोडवा कापूस पिकाला रासायनिक खतांचा वापर करू नये. शेवटची वेचणी पूर्ण झाल्यानंतर कापसाच्या शेतात जनावरांना चराईसाठी सोडावे आणि पीक काढून टाकून शेत मोकळे करावे.

- नांदेड येथील गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी रोझेट फुले गोळा करून नष्ट करावीत. गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावेत, तसेच सामूहिक पकड पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी प्रति हेक्टर २० कामगंध सापळे लावावेत. कापसाची वेचणी संकरित वाणानुसार स्वतंत्रपणे करावी. वेचलेला कापूस साठवणुकीपूर्वी सावलीत वाळवावा. स्वच्छ व सुरक्षित कापूस वेचणीसाठी कापूस वेचणी पिशव्यांचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास त्याद्वारे पिकाला पाणी द्यावे. खोडवा कापूस पिकासाठी खतांचा वापर करू नये. कापसाची वेचणी पूर्ण झाल्यानंतर पीक काढून टाकावे. खोडवा पीक घेणे टाळावे. पीक परिस्थिती, बोंडांची संख्या आणि आर्थिक व्यवहार्यता यांचे योग्य मूल्यांकन केल्यानंतरच बुरशीनाशक किंवा कीटकनाशकांची फवारणी करावी.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani